## :- सूचनापत्र :-

सर्व शिधापत्रिकाधारकांच्या निर्देशनास आणण्यात येते की, केंद्र शासनाच्या अन्न मंत्रालयाच्या दि. ८ फेब्रुवारी, २०१७ अधिसुचनेनुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेतंर्गत लाभ मिळण्यासाठी पात्र लाभार्थ्यांने आधार क्रमांक संबधित कार्यालयास दि. ३० जुन, २०१७ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. त्यामुळे आपल्या सोयीच्या दृष्टीने आपण दि. १५ जुन, २०१७ पर्यंत आपले आधार क्रमांक पुरवठा विभागाच्या संबंधित यंत्रणेकडे कृपया जमा करावेत.

जे पात्र लाभार्थी विहित मुदतीत आधार क्रमांक जमा करणार नाहीत, त्यांना खालील कागदपत्रांची पडताळणी संबंधित शासकीय अधिकाऱ्यांकडून केल्यानंतरच लाभ अनुज्ञेय होणार आहेत.

अ) शिधापत्रिका व

ब) आधार नोंदणी केल्याची स्लीप किंवा आधार नोंदणी करण्यासाठी केलेल्या विहित नमून्यातील विनंतीची प्रत व

क) खालीलपैकी कोणतेही एक कागदपत्र-

१. मतदान ओळखपत्र

२. पॅनकार्ड

३. पासपोर्ट

४. प्राधिकृत अधिकाऱ्याने दिलेला वाहन चालक परवाना

५. राजपत्रित अधिकारी किंवा तहसीलदार यांच्या पत्रावर निर्गमित फोटो ओळखपत्र/ फोटोयुक्त बँक पासबुक

६. पोस्ट विभागाकडून देण्यात आलेले निवासी पत्ता असणारे कार्ड (नाव व फोटोसहित)

७. किसान फोटो पासबुक

८. अन्य राज्य शासन /केंद्रशासित प्रदेश प्रशासनाकडून विनिर्दिष्ट अन्य दस्तऐवज.

************